SHREEMATI NATHIBAI DAMODAR THACKERSEY
**WOMEN'S UNIVERSITY**
01, Nathibai Thackersey Road, Churchgate, Mumbai – 400 020
Telegram : UNIWOMEN Telephone : 22031879 Fax : 2201 8226
Website : www.sndt.ac.in

आस्था/जन-१५/२०१९-२०/1180 सप्टेंबर १३, २०१९

**परिपत्रक :**

प्रति ,
सर्व, संचालक/ विभाग प्रमुख /प्राचार्य/समन्वयक/प्रभारी
चर्चगेट, जुहू, पुणे आवार
श्रीमती ना. दा. ठा. महिला विद्यापीठ.

विषय : सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांना निवृत्तीवेतनविषयक लाभ वेळेवर अदा व्हावेत यासाठी महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्तीवेतन नियम १९८२ मधील नियम ११८ ते १२५ च्या तरतुदींचे काटेकोर पालन करणेबाबत...

संदर्भ : शासन परिपत्रक, वित्त विभाग, संकीर्ण २०१९/३९/प्र.क्र.१७/सेवा-७, दिनांक ०९ सप्टेंबर, २०१९

महोदय/महोदया,

सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांना निवृत्तीवेतनविषयक लाभ वेळेवर प्रदान करण्यासंदर्भात शासनाने यापुर्वी वेळोवेळी सूचना दिलेल्या आहेत. महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्तीवेतन नियम १९८२ च्या प्रकरण १० मधील नियम ११८ ते १२५ च्या तरतुदींचे काटेकोर पालन काटेकोरपणे करण्याचे सूचित केलेले आहे.

सदर बाबतीत दिरंगाई होतानाचे दिसून येत असल्यामुळे, सर्व, संचालक/ विभाग प्रमुख /प्राचार्य/समन्वयक/प्रभारी, चर्चगेट, जुहू, पुणे आवार, श्रीमती ना. दा. ठा. महिला विद्यापीठ यांनी निवृत्तीवेतन व उपदान प्रत्यक्ष देण्याच्या व प्राधिकृत करण्याच्या विहीत कार्यपध्दतीचे पालन करण्यात न आल्याच्या परिणामी ब-याच प्रकरणी सेवानिवृत्त होणा-या कर्मचा-यांना निवृत्तीवेतनविषयक लाभ विलंबाने प्रदान केले जातात. शिवाय विलंबाने प्रदान केलेल्या निवृत्तीवेतन विषयक रकमांवर व्याज प्रदान करण्यचा सूचना आहेत. त्यामुळे त्याचा आर्थिक भार विद्यापीठाच्या तिजोरीवर पडण्याची शक्यता आहे. तसेच निवृत्ती वेतन विषयक लाभांचे प्रदान विलंबाने केल गेल्यामुळे मा. उच्च न्यायालयाने नाराजी व्यक्त केली आहे. ही बाब देखील गंभीर आहे.

उपरोक्त सर्व बाबीस अनुसरून शासनाने पुनश्च वरील संदर्भाधीन परिपत्रकाद्वारे सूचना दिलेल्या आहेत. त्याचे काटेकोरपणे पालन करावे. त्यातील आदेशांचे काटेकोरपणे पालन न केल्यामुळे विलंब झाल्यास जबाबदार असणारे संबधित संचालक/ विभाग प्रमुख /प्राचार्य/समन्वयक/प्रभारी/अधिकारी यांच्या विरूध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल. तसेच निवृत्तीवेतनाची प्रकरणे निकालात काढण्यास दिरंगाई झाल्याने व्याजापोटी विद्यापीटास आर्थिक झळ पोहोचल्यास त्याची जबाबदारी संबधितांवर राहील आणि तशा प्रकारची नोंद संबधितांच्या गोपनिय अहवालात करण्यात येईल. याची नोंद घ्यावी.

(डॉ. दिपक गो. देशपांडे)
कुलसचिव

सेवानिवृत्त होणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतनविषयक लाभ वेळेवर अदा व्हावेत यासाठी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम,१९८२ मधील नियम ११८ ते १२५ च्या तरतुदींचे काटेकोरपणे पालन करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन परिपत्रक,क्रमांक-संकीर्ण २०१९/३९/प्र.क्र.१७/सेवा-७
हुतात्मा राजगुरु चौक,मादाम कामा मार्ग
मंत्रालय,मुंबई ४०००३२.
दिनांक: ९ सप्टेंबर,२०१९

पहा:- १) शासन परिपत्रक,वित्त विभाग,क्रमांक-सेनिवे १००६/८१/सेवा ४,दिनांक २०.११.२००६
२) शासन परिपत्रक,वित्त विभाग,क्रमांक-सेनिवे १००८/५०/सेवा ४,दिनांक १५.०६.२००८
३) शासन निर्णय,वित्त विभाग,क्रमांक -सेनिवे २०१४/प्र.क्र.३६/सेवा-४,दि.०२/०७/२०१५
४) शासन निर्णय,वित्त विभाग,क्रमांक -संकीर्ण २०१५/प्र.क्र.८३/कोषा.प्रशा.५दि.३०/१२/२०१५
५) शासन परिपत्रक,वित्त विभाग,क्रमांक-सेनिवे २०१६/प्र.क्र.३७/सेवा ४,दिनांक २९/०४/२०१६
६) महालेखापाल(लेखा व हकदारी)-२महाराष्ट्र,नागपूर क्र.PM/RetdCases/DEC-२०१८/३२१ दि.२४.०१.२०१९ चे पत्र

## परिपत्रक

१. सेवानिवृत्त होणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतनविषयक लाभ वेळेवर प्रदान करण्यासंबंधात शासनाने यापूर्वी उपरोल्लिखित परिपत्रकांव्दारे वेळोवेळी सूचना दिलेल्या आहेत. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम, १९८२च्या प्रकरण १० मधील म्हणजेच नियम ११८ ते १२५ मधील तरतूदींचे पालन काटेकोरपणे करण्याच्या सक्त सूचना शासनाने देऊनही बऱ्याचशा विभाग/कार्यालय प्रमुखांकडून या सूचनांचे अद्यापही पालन केले जात नाही ही बाब महालेखापाल, नागपूर यांनी उपरोक्त संदर्भादिन क्र.४च्या पत्रान्वये शासनाच्या निदर्शनास आणली आहे.

२. शासनाने या बाबींची गंभीर दखल घेतली आहे. विभाग/कार्यालय प्रमुखांकडून निवृत्तीवेतन व उपदान प्रदान देण्याच्या व प्राधिकृत करण्याच्या विहीत कार्यपध्दतीचे पालन करण्यात न आल्याच्या परिणामी बऱ्याच प्रकरणी सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना निवृत्तीवेतनविषयक लाभ विलंबाने प्रदान केले जातात. परिणामी निवृत्तीवेतनधारकांना आर्थिक त्रास सहन करावा लागतो.शिवाय विलंबाने प्रदान केलल्या निवृत्तीवेतन विषयक रकमांवर व्याज प्रदान करावे लागत असल्यामुळे त्याचा आर्थिक भार शासनाच्या तिजोरीवर पडतो.निवृत्तीवेतनविषयक लाभांचे प्रदान विलंबाने केले गेल्यामुळे मा.उच्च न्यायालयाने काही प्रकरणांत नाराजी व्यक्त केली आहे.ही बाब देखिल गंभीर आहे.

३. उपरोक्त बाबीस अनुसरुन सर्व प्रशासकीय विभाग,विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांना खालीलप्रमाणे पुनश्च सूचना देण्यात येत आहेत:-

- महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम,१९८२,नियम ११८ च्या तरतूदीनुसार प्रत्येक विभाग/कार्यालय प्रमुखाने **दर सहा महिन्यांनी** म्हणजेच दरवर्षी १ जानेवारी व १ जुलै रोजी,त्या तारखेपासून पुढील २४ ते ३० महिन्यांमध्ये सेवानिवृत्त होणाऱ्या सर्व शासकीय कर्मचाऱ्यांची यादी तयार करुन ती संबधित महालेखापाल कार्यालयाकडे ३१ जानेवारी किंवा ३१ जुलै पर्यंत पोहचेल अशा बेताने पाठविणे आवश्यक आहे.शिवाय नियत वयमानाव्यतिरिक्त इतर कारणास्तव सेवानिवृत्त होणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्याच्याबाबतीत अशा सेवानिवृत्तीबद्दल माहिती प्राप्त होताच ती संबधित महालेखापालाना यथाशिघ्र पाठविण्यात यावी.

- महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम,१९८२ नियम १२०च्या तरतूदींनुसार निवृत्तीवेतन विषयक कागदपत्रे तयार करण्याच्या कार्यवाहीस सेवानिवृत्तीच्या तारखेच्या दोन वर्षे अगोदर सुरुवात करणे,निवृत्तीवेतनविषयक कागदपत्रे पूर्ण करताना उपरोक्त नियमावलीच्या नियम १२१ च्या तरतूदीनुसार सेवेची पडताळणी करणे, सेवापुस्तकातील उणीवा भरुन काढणे, सेवानिवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून आवश्यक ती माहिती विहीत नमुन्यात भरुण घेणे इत्यादीबाबतची पूर्तता करुन,कार्यालय प्रमुखाने परिपूर्ण कागदपत्रे उपरोक्त नियमावलीच्या नियम १२२ व १२३ च्या तरतूदीनुसार शासकीय कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीच्या तारखेपूर्वी सहा महिन्यांच्या आत संबधित महालेखापालांकडे **ऑनलाईन** पाठविणे आवश्यक आहे.
- निवृत्तीवेतन विषयक कागदपत्रे वरील तरतूदीनुसार विहीत कालावधीत महालेखापालांकडे सादर केली जात नाहीत अथवा ती अपूर्ण असतात.काही प्रकरणे त्रुटी असल्यामुळे महालेखापाल यांच्या कार्यालयाकडून आक्षेप घेऊन ती संबधित विभाग/कार्यालय यांना परत पाठविण्यात येतात.अशा महालेखापाल कार्यालयाकडून उपस्थित झालेल्या आक्षेपांची पूर्तता संबधित कार्यालय प्रमुखाने १५ दिवसात होईल याची दक्षता घ्यावी.
- वित्त विभागाच्या संदर्भ क्रमांक ३ येथील दिनांक०२,जुलै,२०१५ च्या शासन निर्णयानुसार कार्यालय प्रमुखाने सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांची निवृत्तीवेतन प्रकरणे महालेखापाल कार्यालयास **ऑनलाईन पद्धतीने सादर करणे अनिवार्य** आहे.
- वित्त विभागाच्या संदर्भ क्रमांक ४ येथील दि.३०.डिसेंबर,२०१५ च्या शासन निर्णयानुसार कार्यालय प्रमुखाने,महालेखापाल कार्यालयाकडून निवृत्तीवेतन प्रदान आदेश प्राप्त झाल्यानंतर निवृत्तीवेतनधारकाचे ओळख पडताळणीसाठी आवश्यक असणारे **फॉर्म नमुना 'अ' व नमुना 'ब' व नमुना -४२-अ' ऑनलाईन पद्धतीने अपलोड करण्यात यावे.** तसेच मूळ कागदपत्रे कोषागार कार्यालयास विहीत वेळेत पाठविणे आवश्यक आहे.
- शासकीय कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीच्या तारखेच्या सहा महिने अगोदर संबंधित महालेखापालांच्या कार्यालयाकडे पाठविले जातील याबाबतीत सर्वतोपरी दक्षता घ्यावी.

४. शासनाच्या वरील आदेशांचे काटेकोरपणे पालन न केल्यामुळे विलंब झाल्याचे निदर्शनास आले तर विलंबास जबाबदार असणारे संबंधित अधिकारी/विभाग प्रमुख/ कार्यालय प्रमुख यांचेविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येइल.तसेच "निवृत्तीवेतनाची प्रकरणे निकालात काढण्यास अक्षम्य दिरंगाई झाल्याने व्याजापोटी शासनास आर्थिक झळ बसण्यास जबाबदार आहेत." अशा प्रकारची नोंद संबधीतांच्या गोपनीय अहवालात घेण्यात यावी.

५. सर्व विभाग/कार्यालय प्रमुखांनी उपरोल्लिखित परिपत्रकान्वये देण्यात आलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन केले जाईल, याबाबत आवश्यक दक्षता घ्यावी.अशी प्रकरणे प्रलंबित राहिल्यास या संबंधातील सर्वोतपरी जबाबदारी विभाग/कार्यालय प्रमुखाची राहील असे पुनश्च त्यांच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०९०९१२२६४८०००५ हा आहे.हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

INDRAJEET SAMBHAJI GORE

(इंद्रजीत गोरे)
शासनाचे उपसचिव

प्रति,

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई.
२) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, महाराष्ट्र, नागपूर.
३) महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र, मुंबई.

४) महालेखापाल (लेखा परीक्षा)-२, महाराष्ट्र, नागपूर.
५) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.
६) अधिदान व लेखा अधिकारी, वांद्रे, मुंबई.
७) संचालक, माहिती व जनसंपर्क विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) मुख्य लेखा परीक्षा, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, वाशी, नवी मुंबई.
९) उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/ अमरावती.
१०) वरिष्ठ कोषागार अधिकारी, पुणे / नागपूर / औरंगाबाद / नाशिक.
११) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१२) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१३) मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा / विधानपरिषद.
१४) सर्व विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई.
१५) राज्यपालांचे सचिव.
१६) मुख्यमंत्र्यांचे सचिव.
१७) सर्व मंत्री व राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव.
१८) *प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ न्याय शाखा), मुंबई.
१९) *प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई.
२०) *सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
२१) *सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२२) *प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
२३) *प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई / नागपूर / औरंगाबाद.
२४) मुख्य माहिती आयुक्त, महाराष्ट्र, मुंबई.
२५) आयुक्त, राज्य माहिती आयोग (सर्व).
२६) सचिव, राज्य निवडणूक आयोग, नवीन प्रशासकीय भवन, १ ला मजला, मंत्रालयासमोर, मुंबई ४०० ०३२.
२७) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
२८) सदस्य सचिव, महाराष्ट्र राज्य महिला आयोग, गृहनिर्माण भवन (म्हाडा बिल्डींग), पोट माळा,वांद्रे, मुंबई - ४०० ०५१.
२९) ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, ग्रंथालय, सहावा मजला, विधान भवन, मुंबई - ४०० ०३२.
३०) कार्याध्यक्ष, महाराष्ट्र पेन्शनर्स असोसिएशन, १४४९, सदाशिव पेठ, संकल्प खजिना महाल बोळ, एस.पी.कॉलेजसमोर, पुणे ४११ ०३०.
३१) अध्यक्ष, महाराष्ट्र स्टेट गव्हर्नमेंट पेंशनर्स असोसिएशन, बेळगांव.
३२) मंत्रालयातील सर्व विभाग.
३३) सर्व विभागीय आयुक्त.
३४) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
३५) सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष.
३६) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी.
३७) शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३८) तंत्र शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३९) सर्व जिल्हयांचे वरिष्ठ लेखा परीक्षक (शिक्षण).
४०) संचालक, महानगरपालिका प्रशासन, मुंबई.

४१) सर्व विभागीय शिक्षण उप संचालक.
४२) सर्व विभागीय तंत्र शिक्षण उप संचालक.
४३) कुल सचिव, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर.
४४) कुल सचिव, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी.
४५) कुल सचिव, पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला.
४६) कुल सचिव, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी.
४७) कुल सचिव, डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रज्ञान विद्यापीठ, लोणेर, जिल्हा रायगड.
४८) कुल सचिव, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.
४९) बहुजन समाज पार्टी, डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई - ४०० ००१.
५०) भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरॅक नं.१, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरीमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२०.
५१) भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभुवन, एस.व्ही.पटेल रोड, मुंबई - ४००००४.
५२) भारतीय कम्युनिस्ट पार्टी (मार्क्सवादी), महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई - ४०० ०१३.
५३) इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई - ४०० ०२५.
५४) नॅशनलिस्ट कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरीमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१.
५५) शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई - ४०० ०२८.
५६) ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
५७) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
५८) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
५९) कृषि व पशुसंवर्धन, दुग्ध व्यवसाय विकास व मत्स्य व्यवसाय विभाग, मंत्रालय, मुंबई.
६०) वित्त विभागातील सर्व कार्यासने.
६१) निवड नस्ती.
* पत्राद्वारे.